# एमएमआरसीएल राबवणार 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडा

**मुंबई :** मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या माध्यमातून 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडाचे उद्घाटन व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांच्या हस्ते करण्यात आले. १४ ते २८ जानेवारी दरम्यान 'मराठी भाषा संवर्धन' पंधरवडादरम्यान मराठी भाषेचे वैभव जपण्याच्या हेतूने निबंध स्पर्धा, काव्य लेखन स्पर्धा, घोषवाक्य स्पर्धा तसेच अभिवाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या वेळेस व्यवस्थापकीय संचालक रणजीत सिंह देओल यांनी एमएमआरसीएलमध्ये कार्यरत अमराठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मराठी भाषा अवगत करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे, तसेच कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कार्यालयीन कामात मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करावा, असे आवाहन केले आहे. या वेळी एमएमआरसीएलचे प्रणाली संचालक ए. ए. भट्ट, वित्त संचालक अबोधकुमार खंडेलवाल, नियोजन कार्यकारी संचालक आर. रमण्णा यांच्यासह काही अमराठी अधिकाऱ्यांनी आपले मनोगत मराठीतून व्यक्त केले. मराठी भाषिक कर्मचाऱ्यांनी विचार व्यक्त करताना भाषेच्या इतिहासाचा गौरव केला.